




दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३६७ वा शनिवार दि १६ मे २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये


# शिंदेंच्या बालेकिल्ल्यात महायुतीत धुसफूस, महासभेत भाजप-शिवसेना आमनेसामने, जोरदार खडाजंगी, पोलिसांत तक्रार

**वृत्तसंस्था/ठाणे**

ठाणे महापालिकेत सत्तेत एकत्र असलेल्या शिवसेना-भाजप या मित्रपक्षांमध्येच पुन्हा एकदा महासभेत जोरदार गदारोळ झाला. पाच मिनिटांत २३२ विषय शिवसेनेने प्रशासनाच्या साथीने बहुमताच्या जोरावर मंजूर केल्याचा आरोप भाजपने केला. या पार्श्वभूमीवर भाजपच्या नगरसेवकांनी सभागृहाबाहेर येत शिवसेनेविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच भाजपने जाणीवपूर्वक गोंधळ घालण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप याप्रश्नी शिवसेनेच्या नगरसेवकांनी केला. त्यामुळे नेहमीप्रमाणे महासभेतील चर्चेवरून शिवसेना-भाजपच्या नगरसेवकांची एकमेकांवर कुरघोडी सुरु असल्याचे दिसून आले. ठाणे महापालिकेच्या सलग तिसऱ्या महासभेत शिवसेना-भाजप नगरसेवकांमधील वादाची मालिका कायम राहिली. शुक्रवारी झालेल्या या महासभेत शिवसेनेचे नगरसेवक राजेश मोरे यांच्याकडून एल निनोमुळे भविष्यात होणाऱ्या परिस्थितीबाबत लक्षवेधी सूचना दाखल करण्यात आली होती. या सूचनेवर प्रदीर्घ चर्चा झाली. त्यानंतर महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी सचिवांना विषय पत्रिकेवरील कामकाज सुरू करण्याचे निर्देश दिले. यावेळी विषयपत्रिकेआधी नगरसेवकांनी विचारलेल्या प्रश्नांवर चर्चा करावी, अशी मागणी भाजपचे नगरसेवक संजय वाघुले, नम्रता कोळी, मृणाल पेंडसे यांच्यासह इतर नगरसेवकांनी केली. भाजपचे नगरसेवक विषयपत्रिकेवरील चर्चेसाठी ठाम राहिले. मात्र त्याला सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने उपमहापौर कृष्णा पाटील यांनी आपले आसन सोडून सभागृहात येऊन पहिल्याच विषयाला माझा आक्षेप आहे. तो मंजूर करू नये, अशी मागणी केली. मात्र, शिवसेनेने बहुमताच्या जोरावर एक विषय वगळता सर्व विषय मंजूर करून घेतले, असा आरोप भाजपच्या नगरसेवकांनी केला. या विरोधात भाजपच्या नगरसेवकांनी महापौरांच्या आसनासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले. यावेळी सभागृहात शिवसेना नगरसेवक मनोज शिंदे आणि राजेश मोरे यांनी अचानक राष्ट्रगीत म्हणण्यास सुरुवात केली, असाही आरोप भाजपकडून करण्यात आला. त्यानंतर महासभेचे कामकाज गुंडाळण्यात आले. सभागृहाचे कामकाज संपले नसतानाच, अचानक राष्ट्रगीत सुरू केल्यामुळे राष्ट्रगीताचा अपमान झाला आहे, असा आरोप करीत भाजपचे नगरसेवक संजय वाघुले यांनी पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात येईल, असा इशारा दिला. तसेच सातत्याने पाच मिनिटांत २०० ते ३०० विषय मंजूर केले जात असल्याच्या पद्धतीला भाजपचा विरोध आहे, असेही भाजपचे गटनेते मुकेश मोकाशी यांनी नमूद केले. या गोंधळानंतर भाजपच्या नगरसेवकांनी पाचपाखाडी येथील पालिका मुख्यालयापासून नौपाडा पोलीस ठाण्यापर्यंत चालत जात राष्ट्रगीताच्या अवमान प्रकरणी नौपाडा पोलिसांना निवेदन दिले. हा राष्ट्रगीतासह




सभागृहाचा आणि पीठासीन अधिकाऱ्यांचा अवमान झाल्याचे या निवेदनामधून गटनेते मोकाशी यांनी अधोरेखित केले. दरम्यान, अशाप्रकारे सत्तेत असतानाही चुकीचे वागणे हे निंदनीय आहे. आम्ही भाजपला संख्या कमी असतानाही सत्तेत वाटा दिला आहे. मात्र अशप्रकारे चुकीचे वागून ते सर्वांना वेठीस धरत आहे. त्यांची भूमिका कपटी वाटत आहे. अशी भूमिका घेण्यापेक्षा भाजपने सत्तेतून बाहेर पडावे आणि विरोधी पक्षाची भूमिका पार पाडावी, अशी भूमिका माजी महापौर आणि शिवसेनेच्या नगरसेविका मीनाक्षी शिंदे यांनी या वादाप्रश्नी मांडली.

# मोदींच्या आवाहनाला हरताळ; भाजप मंत्र्याचा शेकडो गाड्यांचा ताफा चर्चेत; स्वागताला बुलडोझर

**वृत्तसंस्था/ लखनऊ**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्य पूर्वेतील संघर्ष, त्यामुळे निर्माण झालेलं जागतिक आर्थिक संकट यांचा दाखला देत देशवासीयांना इंधन बचतीचं आवाहन केलं. पेट्रोल , डिझेल वाचवा. सार्वजनिक वाहतुकीचा वापर करा, असं आवाहन मोदींनी देशाला केलं. मात्र त्यांच्याच पक्षातील नेत्यांनी इंधन बचतीच्या आवाहनाला हरताळ फासला आहे. योगी सरकारमधील नवनियुक्त मंत्री आणि भाजपचे जिल्हाध्यक्ष हंसराज विश्वकर्मा १५ मे रोजी लखनऊहून वाराणसीला पोहोचले. मंत्री झाल्यानंतर ते पहिल्यांदाच स्वत:च्या जिल्ह्यात दाखल झाले. यावेळी त्यांच्या स्वागताला चारचाकी वाहनांचा मोठा ताफा आला होता. विश्वकर्मा यांचं स्वागत केल्यावर वाहनांचा ताफा नवनियुक्त मंत्र्यांच्या पाठोपाठ निघाला. विमानतळापासून विश्वकर्मा यांच्या निवासस्थानापर्यंत शेकडो वाहनांचा ताफा निघाला. यावेळी अर्दली बाजारात मोठी वाहतूक कोंडी झाली. यामध्ये सर्वसामान्यांचे अनेक तास आणि इंधन वाया गेलं. लोकांना मनस्ताप भोगावा लागला. विश्वकर्मा यांच्या कार्यकर्त्यांनी मंडुआडीह भागात स्वागतासाठी बुलडोझर उभे केले होते. विश्वकर्मा मंत्री होताच त्यांच्या कार्यकर्त्यांनी मोठं शक्तिप्रदर्शन केलं. विशेष म्हणजे वाराणसी हा पंतप्रधान नरेंद्र मोदींचा मतदारसंघ आहे. मोदींच्याच मतदारसंघात त्यांच्याच पक्षाच्या मंत्र्यानं इंधन बचतीच्या आवाहनाला हरताळ फासला. १० मे रोजी योगी सरकारमध्ये सहभागी झालेल्या ५ मंत्र्यांमध्ये हंसराज विश्वकर्मा यांचा समावेश आहे. त्यांच्या स्वागतासाठी कार्यकर्ते शेकडोंच्या संख्येनं गाड्या घेऊन विमानतळावर गेले होते. यात अनेक आलिशान कार होत्या. एकीकडे पंतप्रधान मोदी देशवासीयांना इंधन वाचवण्याचं, पेट्रोल-डिझेलचा वापर जपून करण्याचं, कार पुलिंग करण्याचं आवाहन करताना त्यांच्याच पक्षाच्या मंत्र्यानं वाराणसीमध्येच शेकडो वाहनांच्या ताफ्यासह प्रवास केला. त्यामुळे मोदींचं आवाहन त्यांच्या मंत्र्यांना लागू होत नाही की काय, असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला.



मंत्र्यांच्या स्वागताला केवळ आलिशान कारच नव्हत्या. वाहनांचा ताफा मंडुआडीहला पोहोचताच तिथे अनेक बुलडोझर रांगेनं उभे करण्यात आले होते. या बुलडोझरमधून विश्वकर्मा यांचं स्वागत करण्यात आलं. या सगळ्याचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. मोदींच्या वाराणसीत त्यांच्याच मंत्र्यानं दाखवलेला हा साधेपणा चर्चे चा विषय आहे. मोदींच्या आवाहनाकडे दुर्लक्ष करणाऱ्या विश्वकर्मांवर टीकेची झोड उठली आहे.

# भाजपचे आता मिशन पंजाब!

अहोरात्र राजकारण करणाऱ्या भारतीय जनता पक्षानं पश्चिम बंगाल दणदणीतपणे सर केल्यानंतर पुढच्या वर्षीच्या विधानसभा निवडणुकांची तयारी प्रचंड वेगानं सुरू केली आहे. २०२७ च्या फेब्रुवारी-मार्चमध्ये उत्तर प्रदेश, उत्तराखंड, गोवा आणि मणिपूरसोबत पंजाबमध्येही विधानसभा निवडणुका होतील, असं दिसतं. भाजप च्या मुख्यालयात त्यामुळे या राज्यांतल्या नेत्यांची वर्दळ वाढलीय. उत्तर प्रदेशात भाजपला चिंता करण्यासारखी परिस्थिती सध्या तरी नाही. त्यामुळेच कदाचित भाजप नेतृत्वाचं विशेष लक्ष पंजाबकडं आहे. पश्चिम बंगाल, पंजाबसारखी सीमावर्ती राज्यं आपल्या अधिपत्याखाली आणणं हे सामरिकदृष्ट्याही भाजपला आवश्यक वाटत असणार. पंजाब हे पारंपरिकदृष्ट्या भाजपचं राज्य नाही. मागच्या विधानसभा निवडणुका, २०२४ची लोकसभा निवडणूक आणि पोटनिवडणूक यांत पंजाबात भाजपला यश मिळवता आलं नाही. मात्र यश मिळालं नाही म्हणून प्रयत्न सोडून देणाऱ्यांतला सध्याचा भाजप नाही. बंगालपेक्षा जास्त संवेदनशील असलेल्या पंजाबसारख्या राज्यांत सत्तेचा कलश हाती ठेवण्यासाठी भाजपनं आपली एकेक शस्त्रं धारदार करण्यास सुरुवात केली आहे. विशेष मतदारयादी पुनरावलोकन (एसआयआर) ही वादग्रस्त प्रक्रिया पंजाबातही सुरू होत आहेच. भाजप २०२७ च्या पंजाब विधानसभेच्या सर्व ११७ जागांवर निवडणूक लढवील, असं पक्षाध्यक्ष नितीन नवीन यांनी सांगितलं, पण सत्तेत येण्यासाठी मार्ग कोणताही चालेल, असंच धोरण आहे. इतर राज्यांप्रमाणेच पंजाबातही भाजपनं इतर पक्षांमधले नाराज प्रमुख नेते आपल्याकडे ओढण्यास सुरुवात केली आहे. मागच्याच महिन्यात आपचे राज्यसभेतले सात खासदार आणि इतर ज्येष्ठ नेते भाजपमध्ये सामील झाले. त्यातील राघव चड्ढा यांना पंजाबच्या पुढच्या मुख्यमंत्रिपदाची स्वप्नं पडू लागल्याचं सांगितलं जातं. बंगाल, आसाम, बिहारमध्ये भाजपनं आयारामांना मुख्यमंत्रिपदाचा मुकुट सोपवला हे पाहता चड्ढा यांची कथित महत्त्वाकांक्षा अगदीच स्वप्नवत नसणार. दुसरीकडं पंजाबातही ईडी आणि ङ्गसीबीआयफ्सारख्या केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर केल्याचा आरोप मुख्यमंत्री भगवंत मान यांनी थेट राष्ट्रपतींच्या दरबारापर्यंत पोहोचवला; पण दिल्लीत आलेले मान यांचा चेहरा भर दुपारीही जसा ध्यानमग्न दिसत होता, ते पाहता स्वतः केजरीवाल यांनाच पंजाबात प्रचारात मध्यवर्ती भूमिका करणं अपरिहार्य ठरेल. सोशल मीडियावरची प्रसिद्धी आणि राजकीय डावपेचांत पारंगत होत चाललेले चड्ढा आणि सांख्यिकी साधनांच्या माध्यमातून तळागाळातील संघटना उभारण्यात अनुभवी असलेले संदीप पाठक यांची २०२२ च्या पंजाब निवडणुकीतील आपच्या विजयात मोठी भूमिका होती. चड्ढा-पाठक यांनी राज्यसभेत ङ्गआपफ्ला खिंडार पाडलं त्याच सुमारास त्यांच्या एका जवळच्या सहकाऱ्यानं पंजाबमधील ङ्गआपफ्च्या नेत्यांना फोन करण्याचा सपाटा लावून एक प्रस्ताव मांडायला सुरुवात केल्याचं वृत्त आहे. पाठक ङ्गआपफ्च्या नेत्यांना आणि आमदारांना वैयक्तिकरीत्या ओळखतात आणि त्यांनी त्यांना मार्गदर्शनही केले आहे. मग प्रसंगी आपल्या या मार्गदर्शकाची आज्ञा पंजाबतले आप आमदार कशी टाळणार, असा सवाल राजकीय वर्तुळात विचारला जातो, त्यात तथ्यही आहे. प्रश्न हा आहे की, पंजाबसाठी भाजपची रणनीती पश्चिम बंगालसारखीच असेल की वेगळी? सहा वर्षांनंतर भाजप आणि शिरोमणी अकाली दल पुन्हा एकत्र येतील का? भाजप पंजाबमध्ये आपली संघटना मजबूत करून शहरी मतदारांबरोबरच दलित, ओबीसी आणि तरुण मतदारांमध्येही आधार वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. पंजाबात भाजपला स्वतंत्रपणे सत्ता मिळवण्यासाठी अजून मोठा पल्ला गाठायचा आहे. अकाली दल किंवा इतर प्रादेशिक शक्तींशी युती करायची की नाही, हा निर्णय अखेरीस केंद्रीय नेतृत्वाच्याच हातात असेल. भाजपनं पंजाब सर करणं याला बंगालमध्ये वाढलेल्या प्रभावाइतकंच वेगळं महत्त्व असेल. साहजिकच भाजपचं ङ्गमिशन पंजाबफ आता अधिक वेगानं पुढं सरकत आहे. पंजाब जिंकणं अवघड असलं तरी अशक्य नाही, हे भाजपला स्थानिक स्वराज्य संस्था आणि शहरी भागांतील वाढत्या प्रभावातून दिसू लागलं आहे. त्यामुळेच भाजप नेतृत्वानं भविष्यात विनोद तावडे, तरुण चुघ यांसारख्या संघटनात्मक नेत्यांना पंजाबात अधिक सक्रिय भूमिका दिल्यास आश्चर्य नाही. बिहारच्या नव्या सम्राट चौधरी मंत्रिमंडळातील ३१ पैकी जवळपास ४८ टक्के मंत्र्यांवर गुन्हे दाखल असून, त्यापैकी २९ टक्के मंत्र्यांवर गंभीर गुन्ह्यांचे आरोप आहेत. ९० टक्के मंत्री कोट्यधीश आहेत आणि त्यांच्याकडील मालमत्ता प्रत्येकी सरासरी साडेसहा कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. सध्याच्या भाजपला यात गैर वाटत नाही. राजकारणात कोणी भजन-कीर्तन करायला आलेलं नसतं, हे नितीन गडकरींसारख्या भाजपमधील ज्येष्ठांचं सत्यकथन लक्षात घेतलं तर फक्त निवडणुका जिंकण्यासाठी भाजप (वाट्टेल ते) करतं ते वाईट आणि इतरांनी तेच केलं तर तो राजकारणाचा भाग, असा दुटप्पीपणा काँग्रेससह विरोधक किती काळ करणार आणि तो जनतेला कळत नसेल असा शहामृगी पवित्राही किती काळ घेणार हे प्रश्न उपस्थित होणंही स्वाभाविक. असं करून अपेक्षित काही साध्य होत नाही हे लक्षात येऊनही विरोधकांना जाग कशी येत नाही? एकच चूक पुन:पुन्हा केली की ती गुन्हा ठरते हा सर्वमान्य सिद्धान्त राजकारणाला लागू होत नाही असे कसे होईल?




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# ‘व्हीआयपी संस्कृती’ला थारा नाही! मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी हटवला खुर्चीवरचा पांढरा टॉवेल

**चेन्नई/वृत्तसंस्था**

तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि ‘तमिळगा वेत्री कळघम’ (TVK) पक्षाचे प्रमुख जोसेफ विजय यांनी आपल्या कृतीतून एक नवा आदर्श घालून दिला आहे. एका पर्यावरणवादी कार्यकर्तीच्या आवाहनाला मान देत, मुख्यमंत्री विजय यांनी सरकारी कार्यालयांमधील ब्रिटिशकालीन ‘व्हीआयपी संस्कृती’ला (VIP Culture) मूठमाती दिली आहे. मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर वर्षानुवर्षे ठेवला जाणारा पारंपारिक पांढरा टॉवेल विजय यांनी हटवला असून, त्यांच्या या निर्णयाचे सोशल मीडियावर जोरदार स्वागत होत आहे.

प्रसिद्ध पर्यावरणवादी कार्यकर्ती लिसिप्रीया कांगुजम (Licypriya Kangujam) हिने गुरुवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ‘X’ (ट्विटर) वर तामिळनाडूचे मुख्यमंत्री विजय यांना एक आवाहन केले होते. सरकारी कार्यालयांमध्ये मंत्र्यांपासून ते अगदी कनिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्याच खुर्च्यांवर पांढरा टॉवेल ठेवण्याची एक जुनी प्रथा आहे. ही ‘टॉवेल संस्कृती’ व्हीआयपी मानसिकतेचे प्रतीक असून ती बंद करण्यात यावी, अशी मागणी लिसिप्रीयाने केली होती. विजय यांनी स्वतःपासून सुरुवात करून हा बदल घडवून आणावा, असे तिने आपल्या पोस्टमध्ये म्हटले होते. या आवाहनानंतर अवघ्या २४ तासांच्या आत मुख्यमंत्री विजय



यांनी कोणतीही अधिकृत घोषणा किंवा प्रसिद्धी न मिळवता शांतपणे आपल्या खुर्चीवरून तो पांढरा टॉवेल हटवला.

या बदलाबद्दल मुख्यमंत्री कार्यालय किंवा तामिळनाडू सरकारकडून कोणतेही अधिकृत वक्तव्य आलेले नाही. मात्र, नुकत्याच झालेल्या शासकीय बैठकांच्या फोटोंमधून हा मोठा बदल समोर आला आहे.

**१४ मे रोजीची बैठक :** सचिवालय येथे झालेल्या उद्योग आणि गुंतवणूक प्रोत्साहन विभागाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री विजय हे नेहमीप्रमाणे पांढरा टॉवेल असलेल्या पारंपारिक व्हीआयपी खुर्चीवर बसलेले दिसले होते.

**१५ मे रोजीची बैठक :** मात्र, शुक्रवारी ‘TAFE’ कंपनीच्या अध्यक्षा मल्लिका श्रीनिवासन आणि उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मी वेणू यांच्यासोबत झालेल्या बैठकीचे फोटो समोर आले, तेव्हा मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवरचा तो पांढरा टॉवेल गायब होता.

“सामान्य जनतेचा आवाज ऐकणारा मुख्यमंत्री”, अशा शब्दांत लिसिप्रीया कांगुजम हिने विजय यांचे आभार मानले आहेत. सोशल मीडियावरील नेटकऱ्यांनीही हा नोकरशाही आणि राजकारणातील ‘व्हीआयपी’ थाट मोडीत काढणारा एक ऐतिहासिक आणि प्रतीकात्मक बदल असल्याचे म्हटले आहे.

### विजयकडून निर्णयांचा धडाका

अभिनेते ते नेते बनलेल्या विजय यांनी १० मे रोजी तामिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. त्यांच्या ‘टीव्हीके’ (TVK) पक्षाने विधानसभा निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष म्हणून यश मिळवले असून, काँग्रेस आणि डाव्या पक्षांच्या पाठिंब्याने त्यांनी सरकार स्थापन केले आहे. सत्ता हातात येताच घेतलेल्या निर्णयांमुळे विजय यांनी आपण ‘सर्वसामान्यांचे मुख्यमंत्री’ असल्याचा संदेश दिला आहे.

### काय आहे या ‘पांढऱ्या टॉवेल’चा इतिहास?

भारतातील सरकारी कार्यालयांमध्ये अधिकाऱ्यांच्या आणि मंत्र्यांच्या खुर्चीवर पांढरा टॉवेल टाकण्याची प्रथा ही ब्रिटिशकालीन (Colonial Era) गुलामगिरीची आणि वर्गभेदाची आठवण करून देणारी आहे. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिश अधिकारी आपल्या केसांची रचना नेटकी ठेवण्यासाठी ‘मॅकॅसर ऑइल’ (Macassar oil) नावाचे एक तेल वापरायचे. खुर्चीच्या महागड्या लेदरला किंवा लाकडाला हे तेल लागून डाग पडू नयेत, म्हणून खुर्चीच्या वरच्या भागावर कापड ठेवले जायचे. पुढे भारताच्या उष्ण हवामानामुळे या कापडाची जागा पूर्ण पांढऱ्या टॉवेलने घेतली, जेणेकरून घाम शोषला जावा.

## देशभरात महामार्ग बांधणीचा वेग का मंदावला?

**पुणे/वृत्तसंस्था**

पश्चिम आशियातील युद्धामुळे निर्माण झालेला ‘बिटुमिन’चा तुटवडा, वाढलेल्या किमती आणि मंत्रिमंडळ समित्यांच्या मंजुरीअभावी रखडलेल्या प्रकल्पांमुळे देशातील महामार्ग बांधणीचा वेग मंदावल्याची कबुली केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

गडकरी यांनी संतशिरोमणी तुकाराम महाराज पालखी महामार्गाची पाहणी केली. या दरम्यान ‘लोकसत्ता’शी संवाद साधताना पश्चिम आशियातील युद्धामुळे निर्माण झालेला बिटुमिनचा तुटवडा आणि मंदावलेल्या महामार्ग बांधणीवरही भाष्य केले.

महामार्ग उभारणीचे अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. मात्र, महामार्ग बांधणीचा वेग आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रतिदिन २५ किलोमीटरवर आला असून, त्यात सलग तीन वर्षांपासून घसरण होत असल्याकडे लक्ष वेधले असता गडकरी म्हणाले, ‘प्रकल्प पूर्ण करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामध्ये (एनएचएआय) तीन हजार कोटी रुपये आवश्यक आहेत. आता निधीसाठीचा प्रस्ताव मंत्रिमंडळाकडे पाठवावा लागतो. त्यासाठी तीन ते चार समित्या असतात. त्यांच्याकडून परवानगी मिळाल्यानंतर प्रकल्प मंजूर व्हायला वेळ लागतो. त्यामुळे काही प्रमाणात महामार्ग बांधणीचा वेग मंदावला, हे खरे आहे. मात्र, हे सगळे प्रकल्प एकदम मंजूर होतील आणि महामार्ग बांधणीचा वेगही पूर्ववत होईल.’ युद्धामुळे बिटुमिनचा तुटवडा निर्माण झाला असून, त्याच्या किमतीतही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे महामार्गांच्या कामाचा वेग संथ होण्याबरोबर रस्त्यांची बांधणी आणि दुरुस्तीच्या कामांचा खर्च वाढत आहे. याबाबत गडकरी म्हणाले, ‘देशात महामार्ग विकासासाठी ११० लाख टन पेट्रोलियम बिटुमिनची गरज लागते. आता देशामध्ये बायो बिटुमिन बनविण्याला परवानगी देण्यात आली आहे. तांदूळ, कापूस आदी जैविक कचऱ्यापासून बिटुमिन निर्मितीसाठी संशोधन करण्यात आले. या संशोधनामुळे देशातील पहिला बायो बिटुमिनचा १ किलोमीटर लांबीचा रस्ता नागपूर ते जबलपूर महामार्गावर तयार झाला.

## विदेशात प्रवास करण्यासाठी आता टॅक्स लागणार?

**नागपूर/वृत्तसंस्था**

पंतप्रधान मोदी यांनी काही दिवसांपूर्वी विदेशात प्रवास करण्याचे किंवा पर्यटन करणे टाळावे, असे आवाहन केले होते. एका वृत्त संकेतस्थळाने याबद्दल वृत्तांकन करताना सरकार विदेश प्रवासावर कर लावण्याचा विचार करत असल्याचे म्हटले होते. मात्र ही बाब खरी नसल्याचे स्वतः पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केले आहे. शुक्रवारी रात्री पंतप्रधान मोदींनी या बातमीची पोस्ट शेअर करत त्यावर ही धादांत खोटी माहिती असल्याचे सांगितले.

पंतप्रधान मोदींनी रात्री एस्कवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, “ही बातमी पूर्णपणे चुकीची आहे. यात तसूभरही सत्य नाही. विदेशातील प्रवासावर निर्बंध आणण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.” तसेच त्यांनी भारतीय नागरिकांसाठी व्यवसायात सुलभता आणि जीवनात सुलभता आणण्याच्या केंद्र सरकारच्या वचनबद्धतेवरही जोर दिला.

पंतप्रधान मोदींच्या स्पष्टीकरणानंतर आता सदर वृत्त संकेतस्थळाने माफी मागितली असून आपले वृत्त मागे घेतले आहे. विदेशातील प्रवासावर संभाव्य निर्बंध आणि अतिरिक्त कराबाबत अफवा पसरू नये, यासाठी पंतप्रधान मोदी यांनी स्वतः हस्तक्षेप करत हे वृत्त नाकारले. मध्यपूर्वेतील तणावामुळे अर्थव्यवस्थेवर येत असलेला तणाव आणि इंधनाच्या वाढत्या किमतीमुळे सदर बातमीमुळे उलटसुलट चर्चा सुरू झाली होती. भारत कच्च्या तेलाच्या गरजेपैकी ८५ टक्क्यांहून अधिक तेल आयात करतो.



मध्यपूर्वेतील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात व्यत्यय आला आहे. यामुळे भारतासह जगभरात इंधन तुटवड्याचा सामना करावा लागत आहे.

पंतप्रधान मोदी सध्या पाच देशांच्या दौऱ्यावर गेले आहेत. शुक्रवारी त्यांनी संयुक्त अरब अमिरातीच्या राष्ट्राध्यक्षांशी चर्चा केली. मध्यपूर्वेतील तणाव त्यातून विस्कळीत झालेला इंधन पुरवठा यावर भारताची ऊर्जा सुरक्षा बळकट करण्यासाठी संयुक्त अरब अमिरातीबरोबर सामरिक पेट्रोलियम साठ्यांसंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. भारत सरकारमधील सूत्रांनी सांगितले की, या नव्या करारामुळे ऊर्जा सहकार्य अधिक दृढ होईल आणि भारताकडे कच्च्या तेलाचा अधिक पुरवठा होईल.

## ‘पाकिस्तानवर उपकार...’ अमेरिकेने इराणसोबत युद्धविराम का केला? ट्रम्प यांचा खुलासा!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात २८ फेब्रुवारी रोजी सुरू झालेले युद्ध ८ एप्रिल रोजी थांबले. या युद्धबंदीमागे पाकिस्तानची मध्यस्थी कारणीभूत असल्याचा खुलासा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. ‘एअर फोर्स वन’ विमानात पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले की, इराणसोबत युद्धबंदी करण्याची त्यांची इच्छा नव्हती, परंतु पाकिस्तानचा शब्द राखण्यासाठी आणि त्यांच्यावर एकप्रकारे उपकार म्हणून अमेरिकेने हा निर्णय घेतला. ट्रम्प यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान आणि फील्ड मार्शल यांचे कौतुक केले असून इराणला अण्वस्त्र तयार करू न देण्याचा इशारा दिला आहे.

इराणसोबत करण्यात आलेल्या युद्धबंदीमागे पाकिस्तानची मध्यस्थी कारणीभूत असल्याचा खुलासा ट्रम्प यांनी केला आहे. “इराणसोबत युद्धबंदी करण्याची



माझी अजिबात इच्छा नव्हती, पण पाकिस्तानचा शब्द राखण्यासाठी आणि त्यांच्यावर एकप्रकारे उपकार म्हणूनच आम्ही हा निर्णय घेतला,” असा खळबळजनक खुलासा ट्रम्प यांनी केला आहे. यासोबतच, इराणवर आता नव्याने कोणताही बॉम्बहल्ला केला जाणार नसल्याचे स्पष्ट करत ट्रम्प यांनी आखातातील तणाव काहीसा कमी करण्याचे संकेत दिले आहेत.

चीनचा दौरा आटोपून अमेरिकेकडे परतत असताना ट्रम्प यांनी ‘एअर फोर्स वन’ या राष्ट्राध्यक्षांच्या अधिकृत विमानात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ट्रम्प म्हणाले- “आम्ही केवळ एका दुसऱ्या देशाच्या विनंतीचा मान ठेवून ही युद्धबंदी मान्य केली आहे. खरं तर मी या निर्णयाच्या बाजूने नव्हतो, पण पाकिस्तानवर उपकार म्हणून आम्ही हे पाऊल उचलले. पाकिस्तानचे पंतप्रधान आणि फील्ड मार्शल हे दोघेही अत्यंत उत्तम व्यक्ती आहेत.” अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात २८ फेब्रुवारी रोजी थेट युद्धाला सुरुवात झाली होती. त्यानंतर पाकिस्तानच्या मध्यस्थीने दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवल्यानंतर, ८ एप्रिलपासून हे हल्ले थांबवण्यात आले होते.

डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या अणू कार्यक्रमाबाबत आपली भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केली आहे. “इराणला कोणत्याही परिस्थितीत अण्वस्त्र तयार करू दिली जाणार नाहीत. तेहरानने (इराणची राजधानी) युरेनियमचा नाद सोडला पाहिजे,” असा सज्जड दम ट्रम्प यांनी दिला. इराणने पाठवलेला शांतता प्रस्ताव आपण पहिल्याच वाक्यात फेटाळून लावल्याचेही ट्रम्प यांनी सांगितले. आपला अणू कार्यक्रम पूर्णपणे बंद करण्याबाबत इराणने या प्रस्तावात कोणतीही ठोस हमी दिली नव्हती, त्यामुळे अमेरिकेने हा प्रस्ताव नाकारला. इराणसोबत प्रदीर्घ काळ चाललेल्या या संघर्षामुळे ट्रम्प काहीसे राजकीय दबावात असतानाच चीन दौऱ्यावर गेले होते. मात्र, चीनकडून इराणच्या मुद्द्यावर कोणताही मोठा तोडगा काढण्यात त्यांना यश आले नाही. बीजिंगमधील ‘झोंगनानहाई गार्डन’ येथे चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी झालेल्या चर्चेबाबत बोलताना ट्रम्प म्हणाले, “आम्ही इराणच्या समस्येवर सविस्तर चर्चा केली. या समस्येचा कसा तोडगा काढायचा, याबाबत आमच्या दोघांचे विचार बरेच सारखे आहेत. इराणकडे अण्वस्त्रे नसावीत आणि ‘स्ट्रेट ऑफ होर्मुझ’ (होर्मुझची सामुद्रधुनी – जागतिक तेल व्यापाराचा मुख्य सागरी मार्ग) वाहतुकीसाठी खुली राहावी, यावर आमचे एकमत आहे.”

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलडाणा हादरले! नवऱ्याकडून बायकोची हत्या, कुऱ्हाडीने वार करत जागीच संपवलं





■ **बुलडाणा/प्रतिनिधी**

बुलडाण्यामध्ये नवऱ्याने बायकोची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. कुऱ्हाडीने वार करत नवऱ्याने बायकोला जागीच संपवलं. कौटुंबीक वादातून ही घटना घडली. या घटनेमुळे बुलडाणा हादरले. या प्रकरण पोलिसांनी नवऱ्याविरोधात गुन्हा दाखल केला असून तपास सुरू केला आहे. पोलिस सध्या या प्रकरणाचा तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बुलडाण्याच्या जळगावजामोद तालुक्यातील भेंडवळ बुद्रुक गावात ही घटना घडली. कौटुंबिक वादातून नवऱ्याने रागाच्या भरता कुऱ्हाडीने डोक्यावर वार करत बायकोची हत्या केली. मायावती शहादेव भारसाकळे (वय ४६ वर्षे) असं हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे. तर शहादेव शंकर भारसाकळे असं आरोपीचे नाव आहे. नवऱ्याने केलेल्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या मायावती यांना खामगाव येथील सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. पण डॉक्टरांनी मृत घोषीत केले. या प्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. तर, बुलडाण्याच्या खामगावमध्ये कौटुंबिक वादातून नवऱ्याने बायकोची निर्घृण हत्या केली. आरोपीने लोखंडी सब्बलने बायकोचे डोकं ठेचलं. खामगाव येथील रेल्वे गेट परिसरातील झोपडपट्टी भागात ही घटना घडली. नवऱ्याने केलेल्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या बायकोचा जागीच मृत्यू झाला. प्रकाश रूपलाल सोळंकेने (२५ वर्ष) बायको सविता प्रकाश सोळंके (२२ वर्ष) यांच्या डोक्यावर सब्बलने सपासप वार केल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.


बायकोची हत्या केल्यानंतर आरोपी स्वतः खामगाव शहर पोलिस ठाण्यात हजर झाला आणि गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत महिला मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आला. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ (१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करत आहेत.

## प्रेयसीशी Video Call सुरू असतानाच तरुणाचं टोकाचं पाऊल, धक्क्यातून तरुणीनेही..

■ **नागपूर/वृत्तसंस्था**

प्रेमसंबंधातून झालेल्या वादानंतर एका तरुणाने थेट टोकाचे पाऊल उचलत व्हिडिओ कॉलवर प्रियसीशी बोलताना गळफास घेऊन स्वतःला संपवल्याची धक्कादायक घटना लकडगंज पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. प्रियकराच्या मृत्यूची माहिती मिळताच धक्क्यात गेलेल्या तरुणीनेही हाताची नस कापून टोकाचं पाऊल उचलण्याचा प्रयत्न केला. मात्र, कुटुंबियांच्या सतर्कतेमुळे तिचा जीव वाचला.आयुष असे टोकाचं पाऊल उचललेल्या युवकाचे नाव असून तो दाणागंज परिसरात राहत होता. आयुषचे आई-वडील शासकीय सेवेत आहेत. घरचा एकुलता एक असलेला आयुष रेल्वे स्थानकावर हाऊसकिपिंगचे काम करत होता. त्याचे घरासमोर राहणाऱ्या १९ वर्षीय तरुणीशी मैत्री झाली होती. कालांतराने या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. दोघांचे प्रेमप्रकरण परिसरात चर्चेचा विषय ठरले होते. ही बाब त्यांचा कुटुंबीयांच्या लक्षात आल्यानंतर दोन्ही कुटुंबीयांनी चर्चा करून त्यांच्या नात्याला विरोध केला नाही. काही दिवसांत दोघांचे लग्न





करण्याचेही नियोजन सुरू होते.दरम्यान, काही दिवसांपूर्वी आयुष आणि तरुणीमध्ये कोणत्या तरी कारणावरून वाद झाला. या वादातून आयुष मानसिक तणावात गेला. मंगळवारी त्याने तरुणीला व्हिडिओ कॉल केला. कॉलदरम्यान "मला शेवटचे बघून घे," असे म्हणत फोन कट केला. त्यानंतर सकाळी त्याची आई त्याला कामावर जायला उठवायला गेली असता त्याने कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यानंतर दार उघडून पाहिलं असता त्याने घरात गळफास घेत स्वतःला संपवल्याचे समजले. घटनेची माहिती मिळताच लकडगंज पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. टोकाचं पाऊल उचलण्यापूर्वी आयुषने मोबाईलमधील काही चॅट्स डिलीट केल्याची माहिती समोर आली आहे.

## गडकरींना धमकी, १०० कोटी खंडणीची मागणी

**नागपूर :** केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांच्याकडे १०० कोटी रुपयांची खंडणी आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी नागपूर न्यायालयानं दोन आरोपींना पाच वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच दंडाची शिक्षा सुनावली आहे. दंड न भरल्यास अतिरिक्त कारावास भोगावा लागणार आहे, असे न्यायालयाने आदेशात म्हटले आहे.

जयेश पुजारी आणि अफसर पाशा अशी दोन्ही आरोपींची नावे आहेत. या आरोपींनी नितीन गडकरींकडे १०० कोटी रुपयांची खंडणीची मागणी केली होती. तसेच त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती. १४ जानेवारी आणि त्याच्या दोन महिन्यांनी म्हणजेच २१ मार्च रोजी गडकरी यांच्या कार्यालयामध्ये जीवे मारण्याच्या धमकीचे फोन केले होते. हे दोन्ही फोन कर्नाटकातील तुरुंगातून केले होते, असे तपासात स्पष्ट झाले होते. या दोन्ही आरोपींना यूएपीएसह अनेक गंभीर कलमांखाली दोषी ठरवण्यात आले होते. नितीन गडकरी खंडणी आणि धमकी प्रकरणात तपास केल्यानंतर बेंगळुरू कनेक्शन समोर आले होते.

## तरुण-तरुणीवर जीवघेणा हल्ला; ४ ते ५ जणांनी डोक्यात दारूच्या बाटल्या फोडल्या

■ **कल्याण/वृत्तसंस्था**

कल्याण पूर्व परिसरात टवाळखोर तरुणांची दहशत पुन्हा एकदा समोर आली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास केडीएमसीच्या ड प्रभाग कार्यालयाच्या आवारातील उद्यानात बसलेल्या तरुण-तरुणीवर चार ते पाच जणांच्या टोळक्याने हल्ला करत बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात तरुणाच्या डोक्यात बिअरच्या बाटल्या फोडण्यात आल्या. तर मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणीलाही लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. या प्रकरणी कोळशेवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण पूर्वेत राहणारा तेजस चव्हाण हा जिम ट्रेनर असून तो रविवारी रात्री आपल्या मैत्रिणीसोबत केडीएमसीच्या ड प्रभाग कार्यालयाच्या आवारातील उद्यानात बसून गप्पा मारत होता. त्याचवेळी चार ते पाच तरुण तेथे आले आणि त्यांनी तेजसचा मोबाईल हातात घेतला. मोबाईल घेऊन ते निघून जात असताना तेजसने त्यांना मोबाईल परत देण्यास सांगत हटकले. त्यानंतर संबंधित तरुणांनी मोबाईल परत केला आणि तेथून निघून गेले. मात्र काही वेळानंतर हेच तरुण पुन्हा त्या ठिकाणी परत आले. त्यांनी तेजससोबत हुज्जत घालत अचानक त्याच्यावर हल्ला चढवला. टोळक्याने तेजसला बेदम मारहाण करत त्याच्या डोक्यात बिअरच्या बाटल्या फोडल्या. या वेळी तेजससोबत असलेल्या तरुणीने भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी तिलाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या हल्ल्यात तेजस गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. याप्रकरणी तेजसने कोळशेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी चार ते पाच अज्ञात तरुणांविरोधात गुन्हा दाखल केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू केला आहे. दरम्यान, सार्वजनिक ठिकाणी वाढत्या टवाळखोरांच्या दहशतीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी उद्यान आणि सार्वजनिक परिसरात पोलिस गस्त वाढवण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

## माणूस पाहण्यासाठी तडफडतेय, महिलेनं सांगितलं उच्चभ्रू सोसायटीचं वास्तव

■ **पिंपरी/वृत्तसंस्था**

चाळीमधील छोट्या घरांमध्ये राहणारी लोकं कायम मोठ्या लक्झरी घरांची स्वप्न पाहतात. कारण मोठ्या हायप्रोफाईल सोसायटीमध्ये राहिल्यावर त्यांची जीवनशैली सुधारेल, समाजात त्यांची वट वाढेल किंवा सुखी जीवन जगता येईल, अशी त्यांची अपेक्षा असते. आपल्यापैकी अनेकांनी अशी स्वप्न पाहिली असतील. हायप्रोफाईल सोसायटीमध्ये राहताना तुमचं राहणीमान सुधारतं हे १०० टक्के खरं आहे. कारण तुम्हाला पार्किंग, जिम, स्विमिंग पूलपासून अगदी २४ तास पाण्यापर्यंत सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा मिळतात. पण या मोठ्या सोसायट्यांमधील आयुष्य सुखी असतंच, असं ठामपणे सांगता येत नाही. किंबहुना ज्या व्यक्तींनं आयुष्याचा मोठा कालखंड चाळीतील गोंधळात घालवलाय, त्यांच्यासाठी लक्झरी घरांमधील शांतता एखाद्या जेलसारखी भासते. आणि असाच काहीसा अनुभव एका महिलेनं सांगितला आहे. ती म्हणतेय, कोट्यवधी रुपये



खर्च करून ती एका जेलमध्ये आली आहे.

'४ वर्ष झाली शेजारी कोण राहातं माहित नाही', माणूस पाहण्यासाठी तडफडतेय, महिलेनं सांगितलं उच्चभ्रू सोसायटीचं वास्तव, पाहा व्हिडीओ

लक्झरी सोसायट्यांमध्ये सर्व सुविधा मिळत असल्या, तरी अनेकांना तिथलं आयुष्य एकाकी आणि भावनाहीन वाटतं. असाच काहीसा अनुभव सांगणाऱ्या एका महिलेचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. गेल्या चार वर्षात शेजारी कोण राहतेय हे महिलेला ठावूक नाही. या व्हिडीओवर नेटकरी विविध प्रकारच्या प्रतिक्रिया देत आहेत.

चाळीमधील छोट्या घरांमध्ये राहणारी लोकं कायम मोठ्या लक्झरी घरांची स्वप्न पाहतात. कारण मोठ्या हायप्रोफाईल सोसायटीमध्ये राहिल्यावर त्यांची जीवनशैली सुधारेल, समाजात त्यांची वट वाढेल किंवा सुखी जीवन जगता येईल, अशी त्यांची अपेक्षा असते. आपल्यापैकी अनेकांनी अशी स्वप्न पाहिली असतील. हायप्रोफाईल सोसायटीमध्ये राहताना तुमचं राहणीमान सुधारतं हे १०० टक्के खरं आहे. कारण तुम्हाला पार्किंग, जिम, स्विमिंग पूलपासून अगदी २४ तास पाण्यापर्यंत सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा मिळतात. पण या मोठ्या सोसायट्यांमधील आयुष्य सुखी असतंच, असं ठामपणे सांगता येत नाही. किंबहुना ज्या व्यक्तींनं आयुष्याचा मोठा कालखंड चाळीतील गोंधळात घालवलाय, त्यांच्यासाठी लक्झरी घरांमधील शांतता एखाद्या जेलसारखी भासते. आणि असाच काहीसा अनुभव एका महिलेनं सांगितला आहे. ती म्हणतेय, कोट्यवधी रुपये खर्च करून ती एका जेलमध्ये आली आहे.

या व्हिडीओमधील महिलेनं उच्चभ्रू सोसायटीमधील आपला अनुभव शेअर केला आहे. ती म्हणतेय, "या उंच उंच इमारती लांबूनच छान वाटतात. पण यांचं वास्तव भयानक आहे. गेली चार वर्ष आम्ही इथे राहतोय, पण शेजारच्या घरात कोण राहतं हेही आम्हाला माहिती नाही. इथे कोणीच कोणाशी बोलत नाही. या इमारती एक प्रकारच्या जेल आहेत. बाहेर पाऊस पडत असला तरी भिजता येत नाही, कारण लिफ्टनं खाली जाईपर्यंत पाऊस गेलेला असतो. शेजाऱ्यांना चहा प्यायला बोलावता येत नाही, कोणी गप्पा मारायला नाही. त्यामुळे एकांतात आयुष्य काढावं लागतं."हा व्हिडीओ २६ लाखांहून अधिक वेळा पाहिला गेला आहे. शिवाय अनेकांनी या व्हिडीओवर विविध प्रकारच्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. कोणी या महिलेला टोला मारतंय की, लोकं प्रायव्हसीसाठी कोट्यवधी रुपये खर्च करतात आणि प्रायव्हसी मिळाल्यावर बोलायला कोणी नाही म्हणून तक्रार करतात. तर काहींनी या महिलेला एखादा छंद जोपासण्याचा सल्ला दिला आहे. अन्यथा हा एकांत तिला कधीतरी डिप्रेशनमध्ये घेऊन जाईल.

# प्लेऑफचे दोन संघ जवळपास निश्चित, तर 2 स्थानांसाठी तीन संघांमध्ये चुरशीची लढत

**मुंबई, वृत्तसंस्था :**

आयपीएल २०२६ मध्ये प्लेऑफची लढत अधिक चुरशीची झाली आहे. प्लेऑफला जाणारे २ संघ जवळपास निश्चित झाले असून उर्वरित दोन जागांसाठी घमासान सुरू आहे. आयपीएल २०२६ च्या ५९ व्या सामन्यानंतर गुणतालिकेत मोठा बदल झाला आहे. हा सामना लखनौ येथील एकना स्टेडियमवर लखनौ सुपर जायंट्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यात खेळला गेला. लखनौने हा सामना ७ गडी राखून जिंकून चेन्नईला मोठा धक्का दिला. त्यामुळे आता प्लेऑफच्या शर्यतीत मोठा बदल झाला आहे.

चेन्नई सुपर किंग्सला या हंगामातील सहाव्या पराभवाला सामोरं जावं लागलं. सलग तीन सामने जिंकल्यामुळे त्यांनी प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आशा बळकट केल्या होत्या. मात्र, या पराभवामुळे त्यांना मोठा धक्का बसला आहे. आता १२ सामन्यांमधून त्यांचे केवळ १२ गुण झाले असून, ते पाचव्या स्थानावरून सहाव्या स्थानावर घसरले आहेत. याचा तगडा फायदा राजस्थान रॉयल्सला झाला असून, तेही ११ सामन्यांमधून १२ गुणांसह सहाव्या स्थानावरून पाचव्या स्थानावर आले आहेत.




दुसरीकडे, लखनौ सुपर जायंट्सला या विजयाचा फायदा झालेला नाही. ते १० व्या स्थानावर कायम आहेत. १२ सामन्यांमधून त्यांचे आता ८ गुण झाले आहेत. मुंबई इंडियन्सचेही ८ गुण आहेत, पण नेट रन रेटमुळे मुंबई ९ व्या स्थानावर आहे. या दोन संघांव्यतिरिक्त, केकेआरनेही आतापर्यंत फक्त ४ सामने जिंकले आहेत, तर त्यांचा एक सामना पावसामुळे रद्द झाला होता, त्यामुळे ते ९ गुणांसह ८ व्या स्थानावर आहेत.

गुजरात टायटन्स व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हे दोन्ही संघ १६ गुणांसह प्लेऑफच्या उंबरठ्यावर आहेत. यानंतर हैदराबादचा संघ १४ गुणांसह तिसऱ्या स्थानी असून त्यांची प्लेऑफ गाठण्याची शक्यता ७० टक्के आहे. तर सलग पाच पराभवांनंतर चौथ्या स्थानी असलेल्या पंजाब किंग्सची प्लेऑफ गाठण्याची शक्यता ५० टक्केपेक्षा कमी असून त्यांना कोणत्याही स्थितीत उर्वरित दोन सामने मोठ्या फरकाने जिंकणं गरजेचं आहे.

लखनौच्या पराभवामुळे पाचव्या स्थानी असलेल्या राजस्थान रॉयल्सला तगडा फायदा झाला आहे. आता पंजाब किंग्सपेक्षा राजस्थान प्लेऑफ गाठण्याची शक्यता ५१ टक्के आहे. राजस्थानचे अजून ३ सामने बाकी असून तिन्ही सामने जिंकल्यास संघ प्लेऑफ गाठू शकतो. तर लखनौने केलेल्या पराभवानंतर चेन्नईची प्लेऑफ गाठण्याची शक्यता २८ टक्के आहे. संघाने उर्वरित दोन सामने जरी जिंकले तरी इतर संघांच्या निकालांवरून आणि रन रेटवर त्यांना अवलंबून राहावं लागणार आहे. तर दिल्ली आणि केकेआरची प्लेऑफ गाठण्याची शक्यता फक्त ३-३ टक्के उरली आहे. म्हणजेच आता तिसऱ्या आणि चौथ्या स्थानासाठी हैदराबाद, राजस्थान व पंजाबमध्ये चुरस असणार आहे.

## फातिमा सनाचा टी-२० मध्ये वर्ल्ड रेकॉर्ड

**मुंबई /वृत्तसंस्था**


टी-२० इतिहासात आता एक नवा विश्वविक्रम रचला गेला आहे.पाकिस्तान महिला संघाची कर्णधार फातिमा सनाच्या स्फोटक फलंदाजीने सर्वांनाच आश्चर्यचकित केलं आहे. सध्या पाकिस्तानचा महिला संघ टी-२० विश्वचक २०२६ची तयारी करत आहे. यादरम्यान पाकिस्तान आणि झिम्बाब्वे महिला संघांमध्ये टी-२० मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील सामन्यादरम्यान फातिमा सनाने मोठा विक्रम आपल्या नावे केला.

पाकिस्तानची कर्णधारा फातिमाने झिम्बाब्वेविरुद्धच्या तिसऱ्या महिला टी-२० सामन्यात अवघ्या १५ चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावून इतिहास घडवला आहे. महिला टी-२० क्रिकेटमधील हे सर्वात जलद अर्धशतक आहे. कराची येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात, २४ वर्षीय फातिमा सनाने फलंदाजीला उतरताच झिम्बाब्वेच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. तिने अवघ्या १५ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण करून पूर्वीचा विक्रम मोडला. सनाने या सामन्यात सर्वात जलद अर्धशतकासह १९ चेंडूत १० चौकार व २ षटकारांच्या मदतीने ६२ धावांची खेळी केली. महिलांच्या टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील सर्वात जलद अर्धशतकाचा विक्रम सोफी डिव्हाईन, फिबी लिचफिल्ड आणि ऋचा घोष यांच्या नावावर संयुक्तपणे होता, ज्यांनी प्रत्येकी १८ चेंडूंमध्ये आपलं अर्धशतक पूर्ण केलं होतं. आता फतिमा सना हिने १५ चेंडूत अर्धशतक झळकावत पहिलं स्थान गाठलं आहे. फातिमाचा हा वर्ल्ड रेकॉर्ड फक्त टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांपुरता मर्यादित नसून तिने महिलांच्या टी-२० क्रिकेटमधील सर्वात जलद अर्धशतकाच्या विक्रमाची बरोबरीही केली. यापूर्वी हा पराक्रम २०२२ मध्ये वॉरविकशायरसाठी मेरी केलीने आणि या वर्षी न्यूझीलंडच्या सुपर स्मॅश स्पर्धेत लॉरा हॅरिसने केला होता.

## ना अय्यर, ना बुमराह, 'हा' खेळाडू होणार भारताचा नवा टी-२० कर्णधार! रवि शास्त्रींची मोठी भविष्यवाणी

**जयपूर/वृत्तसंस्था**

भारताच्या टी-२० संघाचा कर्णधार म्हणून सूर्यकुमार यादवची कामगिरी प्रभावी राहिली आहे. आपल्या दोन वर्षांच्या कार्यकाळात त्याने एकही द्विपक्षीय मालिका गमावलेली नाही. याशिवाय आशिया चषकही जिंकून दिली. महत्त्वाचं म्हणजे सूर्याच्या नेतृत्त्वाखाली भारताने सलग दुसरा टी-२० विश्वचषक पटकावला आणि इतिहास घडवला. कर्णधार म्हणून त्याची कामगिरी उत्कृष्ट असली तरी, त्याची फलंदाजीची सरासरी २५ च्या खाली घसरली आहे, जी त्याच्या मानकांनुसार खूपच कमी आहे. आता सूर्याच्या जागी भविष्यातील टी-२० कर्णधार कोण असणार, याची भविष्यवाणी रवी शास्त्रींनी केली आहे.



गेल्या वर्षभरात २०२५ मध्ये सूर्यादादाच्या बॅटमधून अपेक्षित अशी कामगिरी पाहायला मिळालेली नाही. तर २०२६ मध्ये टी-२० विश्वचषकातही काही सामने वगळता सूर्या मोठी खेळी करण्यात अपयशी ठरला होता. दरम्यान यंदाच्या आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्ससाठी त्याचा सध्याचा फॉर्मही निराशाजनक राहिला आहे, ज्यामुळे नजीकच्या काळात भारतीय टी-२० संघाचा कर्णधार बदलू शकतो अशी चर्चा सुरू आहे. रवी शास्त्रींच्या मते, जर निवडकर्ते एखाद्या प्रबळ दावेदाराच्या शोधात असतील, तर राजस्थान रॉयल्सचं नेतृत्त्व केलेल्या आणि कर्णधारपदाच्या अनुभवामुळे संजू सॅमसन आघाडीवर असायला हवा. 'आयसीसी रिव्ह्यू' या कार्यक्रमात प्रसिद्ध क्रीडा निवेदिका संजना गणेशन यांच्याशी बोलताना रवी शास्त्री म्हणाले, "२०२८ मध्ये होणाऱ्या पुढील टी२० विश्वचषकापर्यंत भारताला नवीन कर्णधाराच्या शोधात असणार आहे. अर्थात हे सूर्या पुढील काही वर्षांत कशी कामगिरी करतो यावर अवलंबून असेल." रवी शास्त्री पुढे म्हणाले, "पण संजू सॅमसनने यापूर्वी राजस्थानचं नेतृत्त्व केल्यामुळे, तो या पदासाठी एक प्रबळ दावेदार म्हणून सिद्ध झाला आहे. फलंदाजीच्या वरच्या फळीत त्याचं स्थान पक्क आहे आणि तो एक अत्यंत आक्रमक फलंदाज आहे. त्यामुळे, पुढील दोन-तीन वर्षांत संजूसाठी आणखी मोठ्या गोष्टींची ही केवळ सुरुवात आहे, असं मला वाटतं." टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेत अनेक मॅचविनिं खेळींमुळे सॅमसनला 'प्लेअर ऑफ द टूर्नमिंट' म्हणून गौरविण्यात आलं.

## ICC चा पाकिस्तान संघाला मोठा दणका! दंडात्मक कारवाईसह WTC गुणतालिकेत तब्बल ८ गुण केले वजा

**मुंबई)/वृत्तसंस्था**

आयसीसीने पाकिस्तान क्रिकेट संघावर कडक कारवाई करत मोठा दंड ठोठावला आहे. याचा संघाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेतही मोठा फटका बसला आहे. पाकिस्तानी संघ सध्या २०२५-२७ च्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिप चक्राचा भाग म्हणून दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी बांगलादेश दौऱ्यावर आहे. पहिला सामना मीरपूरमध्ये खेळला गेला आणि त्यात पाकिस्तानी संघ १०४ धावांनी पराभूत झाला.

आता आयसीसीने मिरपूर कसोटीतील स्लो ओव्हर रेटमुळे पाकिस्तानी संघावर मोठी कारवाई केली असून, यामध्ये त्यांच्या सामना शुल्कावर दंड आकारण्यासोबतच, जागतिक कसोटी चॅम्पियनशिप २०२५-२७ च्या गुणतालिकेतून त्यांचे गुणही मोठ्या प्रमाणात कमी केले आहेत. आधीच पाकिस्तान संघाची कसोटीत अवस्था बिकट असताना आयसीसीने केलेल्या या कारवाईचा संघाला मोठा फटका बसला आहे. आयसीसीच्या पाकिस्तान संघाला ठोठावलेल्या दंडामधील अहवालात असं म्हटलं आहे की, मीरपूर स्टेडियममध्ये बांगलादेशविरुद्ध खेळल्या गेलेल्या कसोटी सामन्यात त्यांनी निर्धारित वेळेपेक्षा आठ षटकं कमी टाकली. परिणामी, खेळाडूंना त्यांच्या सामना शुल्काच्या ४० टक्के दंड आकारण्यात आला आणि कमी टाकलेल्या प्रत्येक षटकासाठी एक गुण वजा करण्यात आला. यामुळे, पाकिस्तानी संघाने



पराभवासाठी केवळ एक गुणच गमावला नाही, तर एकूण आठ गुण गमावले. आयसीसीच्या या कारवाईनंतर आता, त्यांचे एकूण फक्त ४ गुण शिल्लक आहेत, ज्यामुळे पाकिस्तानी संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५-२७ गुणतालिकेत थेट ८व्या स्थानावर पोहोचला आहे, ज्यामध्ये केवळ वेस्ट इंडिज संघ त्यांच्या खाली आहे, ज्यांच्या गुणांची एकूण टक्केवारी ४.१७ आहे.

पाकिस्तानचा कर्णधार शान मसूदने षटकांचा वेग कमी ठेवल्याबद्दल आयसीसीने संघावर केलेली कारवाई स्वीकारली असून, या प्रकरणात आता कोणतीही पुढील औपचारिक सुनावणी होणार नाही. मैदानातील पंच रिचर्ड केटलबरो आणि कुमार धर्मसेना, तसेच तिसरे पंच अलाउद्दीन पालेकर आणि चौथे पंच गाझी सोहेल यांनी पाकिस्तानी संघावर स्लो ओव्हर रेटसाठी आरोप केला होता. त्यांच्या तक्रारीनंतर, सामनाधिकारी जेफ क्रो यांनी प्रकरण ऐकून दंडात्मक कारवाई केली. दोन्ही संघांमधील दुसरा कसोटी सामना १६ मेपासून सिल्हेट येथे खेळला जाईल.

# मौनी रॉय आणि सुरजचा लग्नाच्या 4 वर्षात काडीमोड, अभिनेत्रीकडून घटस्फोटाची घोषणा

काही दिवसांपासून बॉलिवूड अभिनेत्री मौनी रॉय आणि सुरज नंबियार यांचा घटस्फोट झाल्याच्या चर्चा सोशल मीडियावर होत होत्या. अशातच आता मौनी रॉयनं सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत घटस्फोटाच्या चर्चांना दुजोरा दिला असून ती पतीसोबत विभक्त होत असल्याचं सांगितलं आहे.मौनी रॉयनं इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत घटस्फोटाची घोषणा करत लिहिलं की, 'माध्यमांनी आमच्या खासगी आयुष्यात हस्तक्षेप केल्यामुळे खूप वाईट वाटतंय. मी आणि सुरजने आता वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. तसंच, या संबंधित इतर गोष्टी खासगीरित्या आणि सामंजस्यानं हाताळण्यासाठी आम्ही वेळ घेत आहोत.'मौनी पुढे लिहिते की, 'काल्पनिक कथा आणि खोट्या गोष्टी पसरवून आमच्या खासगी आयुष्याला वेगळं वळण देण्याचे प्रयत्न केले गेले आहेत. मात्र, या गोष्टींमुळे आमच्यात जे घडलंय ते बदलणार नाही. आमच्या बदलत्या वैयक्तिक प्राधान्यांचा सखोल विचार केल्यानंतर, आम्ही दोघांनीही परस्पर संमतीनं, आदर आणि समजूतदारपणे पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या, या स्थितीतून अत्यंत विचारपूर्वक आणि योग्य मार्ग काढण्याचा आमचा विचार आहे.'भविष्यातही आमची मैत्री जपण्याचा आम्ही नक्कीच प्रयत्न करू. या कठीण काळात तुम्ही दाखवलेली समज, आमच्या प्रायव्हसीचा केलेला आदर आणि आम्हाला केलेला सपोर्ट, याबद्दल आम्ही तुमचे मनापासून आभारी आहोत.' असं मौनीनं शेवटी म्हटलंय.दोन दिवसांपूर्वी मौनी रॉयनं सोशल मीडियावर पोस्ट करत, 'मी सर्वांना विनंती करते की, खोट्या बातम्या पसरवू नका आणि कृपया आम्हाला प्रायव्हसी आणि आमचा वेळ द्या.' असं म्हटलेलं. आता अभिनेत्रीनं घटस्फोटाची घोषणा केल्यानं तिच्या चाहत्यांना धक्के बसलाय.दरम्यान, मौनी रॉयनं २७ जानेवारी २०२२ रोजी गोव्यात सूरज नंबियारसोबत लग्न केलं. हळद आणि संगीत यांसारख्या अनेक विधींनंतर, या जोडप्यानं पारंपरिक मल्याळी आणि बंगाली रितीरिवाजानुसार आपला विवाहसोहळा साजरा केला. यानंतर पूल पार्टीचं आयोजनही करण्यात आलेलं.






## हिंदी येत नाही आणि सीतेची भूमिका साकारणार 'रामायण' सिनेमामुळे साई पल्लवी नेटकऱ्यांच्या निशाण्यावर

नितेश तिवारी यांच्या 'रामायण' चित्रपटात सीतेची भूमिका साकारणारी साई पल्लवी सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे. रिपोर्टनुसार, चित्रपटाचे निर्माते साई पल्लवीचा आवाज डब करण्याचा विचार करत आहेत. यामागचं कारण म्हणजे तिची हिंदी भाषा असून त्यावर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. काही नेटकऱ्यांनी अभिनेत्रीला सिनेमात कास्ट केल्याबद्दल ट्रोल केलं आहे. साई पल्लवी 'रामायण' या सिनेमात सीतेची भूमिका साकारणार आहे. मात्र, साई पल्लवीचा पहिला बॉलिवूड डेब्यू असलेला 'एक दिन' या सिनेमाच्या प्रमोशनदरम्यान अभिनेत्रीला तिच्या हिंदी भाषेमुळे ट्रोल करण्यात आलं. 'रामायण' हा सिनेमा हा एक भव्य आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचा चित्रपट असल्यामुळे संपूर्ण टीमला चित्रपटाची भाषा स्पष्ट, शुद्ध आणि स्पष्ट असावी असं वाटतं. 'एक दिन'मधील साई पल्लवीचे पात्र एका तमिळ मुलीचं आहे, त्यामुळे तिचे उच्चार अगदी योग्य होते. परंतु 'रामायण'मधील सीतेच्या भूमिकेसाठी शुद्ध हिंदी भाषेची आवश्यकता आहे.एक दिन'च्या एका प्रमोशनदरम्यानचा व्हिडिओ सोशल मीडियावर





व्हायरल झाल्यावर साई पल्लवीच्या हिंदी भाषेबद्दलचा वाद अधिकच वाढला. काहींनी 'रामायण'मधील तिच्या कास्टिंगवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, तर अनेक चाहते अभिनेत्रीच्या समर्थनार्थ पुढे आले. एका युझरनं लिहिलं, 'मला वाटतं की, साई पल्लवीने 'रामायण' हा सिनेमा फक्त हिंदी भाषा सुधारावी म्हणून केलाय.' दुसऱ्या एका युझरने उपहासानं लिहिलं, 'साई पल्लवीला साधी हिंदीसुद्धा येत नाही, आणि आता ती सीतेची भूमिका साकारणार आहे.'दरम्यान, 'रामायण' बहुप्रतीक्षित सिनेमांपैकी एक असून या चित्रपटाचं दिग्दर्शन नितेश तिवारी यांनी केलंय. रणबीर कपूरनं प्रभू रामाची, यशने रावणाची, सनी देओल हनुमानाची आणि रवी दुबेनं लक्ष्मणाची भूमिका साकारणार आहे. त्याचबरोबर साई पल्लवी सीतेची भूमिका साकारणार आहे.साई पल्लवीने स्वतः यापूर्वी तिच्या हिंदी भाषेवर भाष्य केलेलं. 'मला अनेकदा वाटायचं की मी या भूमिकेसाठी योग्य नाही. या भूमिकेसाठी एका नवीन आणि आकर्षक चेहऱ्याला संधी द्यावी, असं मला वाटायचं.'

## 'ते' मराठी गाणं अन् बायकोसाठी...; माधुरी दीक्षितच्या वाढदिवशी नवऱ्याने केली 'ही' गोष्ट

बॉलीवूडची 'धकधक गर्ल' माधुरी दीक्षित आज तिचा ५९ वा वाढदिवस साजरा करतेय. अभिनेत्रीने १९८४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'अबोध' सिनेमातून बॉलीवूडमध्ये एन्ट्री घेतली होती. पण, तिला खऱ्या अर्थाने प्रसिद्धी 'तेजाब' चित्रपटामुळे मिळाली. हळुहळू माधुरी बॉलीवूडची 'धकधक गर्ल' म्हणून ओळखली जाऊ लागली. करिअरच्या शिखरावर असताना माधुरीने लग्न केलं. १९९९ मध्ये तिने डॉ. श्रीराम नेनेंशी लग्नगाठ बांधली. आज लाडक्या बायकोच्या वाढदिवसानिमित्त डॉ. नेनेंनी खास पोस्ट शेअर केली आहे.

माधुरीच्या वाढदिवसानिमित्त डॉ. नेनेंनी खास मराठी गाणं लावून पोस्ट शेअर केली आहे. खरंतर, अमेरिकेत शिक्षण पूर्ण झाल्याने नेनेंना हिंदी नीट येत नाही, असं माधुरीने आधीच अनेक मुलाखतींमध्ये सांगितलं होतं. मराठी कुटुंबात जन्म झाल्याने नेनेंना मराठी व्यवस्थित समजतं. त्यामुळे बायकोला इम्प्रेस करण्यासाठी त्यांनी गोड फोटो शेअर करत या पोस्टला मराठी गाणं लावलं आहे, या गाण्याचे बोल आहेत...

चांद तू नभातला नि बावळा चकोर मी
गुलाम होउनी तुझा... उभा तुझ्या समोर मी



तू चंचला, तू कामिनी, तू पद्मिनी, तू रागिणी,
तनामनात माझिया तुझी सदैव मोहिनी

यासह नेने लिहितात, "माझ्या प्रिय पत्नीला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा! आपण येत्या वर्षांत सुद्धा असेच विविध ठिकाणी फिरायला जाऊयात...तू मला आणि आपल्या कुटुंबाला कायम साथ दिलीस, कायम आमच्या पाठिशी राहिलीस...याबद्दल तुला खूप प्रेम!"

श्रीराम नेनेंच्या पोस्टवर नेटकऱ्यांनी कमेंट्सचा वर्षाव केला आहे. "खूप-खूप प्रेम", "हे आहे खरं प्रेम", "वाह काय गाणं सिलेक्ट केलंय कमाल", "वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा माधुरी मॅम", "Our धकधक गर्ल", "एव्हरग्रीन कपल", "याला म्हणतात प्रेम" अशा विविध प्रतिक्रिया नेनेंनी शेअर केलेल्या पोस्टवर आल्या आहेत.

## आरसीबीच्या क्रिकेटपटूसोबत जोडलं जातंय शहनाज गिलचं नाव

आयपीएल २०२६ मध्ये सर्व संघांमधील स्पर्धा खूप वाढली आहे. टॉप 4 मध्ये स्थान मिळवण्यासाठी संघांची लढाई सुरू आहे. दरम्यान, क्रिकेटप्रेमीही तितकेच उत्साही असून आपल्या संघांना पूर्णपणे पाठिंबा देत आहेत. सेलिब्रिटीसुद्धा आपला आयपीएलचा उत्साह दाखवत आहेत. काल झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळूरने कोलकाता नाईट रायडर्सचा पराभव केला आणि आता आरसीबी पॉईंट्स टेबलमध्ये अव्वल स्थानी आहेत. यापूर्वी गुजरात टायटन्स अव्वल स्थानी होता. काल, बिग बॉसची माजी स्पर्धक आणि अभिनेत्री शहनाज गिलनेही सामन्याला हजेरी लावली होती. यादरम्यान अभिनेत्री आरसीबीला पाठिंबा देताना दिसली. अभिनेत्रीचा एक नवीन व्हिडिओ व्हायरल होत असून तिचं नाव आरसीबी संघातील एका क्रिकेटपटूसोबत जोडलं जातंय.शहनाज गिल आरसीबीला पाठिंबा देताना दिसण्याची ही पहिली वेळ नाही. यापूर्वी अभिनेत्रीनं एका मैत्रिणीसोबत संघाचा विजय साजरा करताना आरसीबीच्या जर्सीमधील एक फोटो शेअर





केला होता. शहनाज गिल सोशल मीडियावर बरीच सक्रिय आहे. त्यामुळेच शहनाजचा नवीन व्हिडिओ व्हायरल झालाय. शहनाज गिलने इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला असून तिनं 'मजा आली' असं कॅप्शन दिलंय. व्हिडिओमध्ये, अभिनेत्री आरसीबीची जर्सी घालून स्टँड्समध्ये बसलेली दिसत आहे. संघ जिंकताच शहनाज गिल आनंदाने उड्या मारू लागली. शहनाज 'आपण जिंकलो, आपण जिंकलो' अशी ओरडताना दिसत आहे. नंतर, ती 'आरसीबी-आरसीबी' असा जयघोषही करताना दिसतेय. अभिनेत्रीच्या व्हिडिओवर चाहत्यांकडून, विशेषतः आरसीबीच्या चाहत्यांकडून, अनेक कमेंट्स येत आहेत. चाहत्यांनी शहनाजचं कौतुक केलंय. सोशल मीडियावर काही नेटकऱ्यांनी शहनाजचं नाव देवदत्त पडिक्कलसोबत जोडलंय आणि त्याच्यासाठीच अभिनेत्री स्टेडियममध्ये गेली असल्याचं म्हटलंय. त्यामुळे आता शहनाज गिल आणि देवदत्त पडिक्कलच्या डेटिंगच्या चर्चा होत आहेत. मात्र, यावर अद्याप देवदत्त किंवा शहनाजने कोणीतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.दरम्यान, शहनाज गिलच्या कामाबद्दल सांगायचं तर अभिनेत्रीला सलमान खानच्या 'बिग बॉस' या शोमधून ओळख मिळाली. शहनाजनं अनेक चित्रपटांमध्ये काम केलं असून ती स्वतः एका चित्रपटाची निर्मितीही आहे.

# मतदार याद्यांची विशेष सखोल पुनरिक्षण मोहिम

जनसंचलन/बुलढाणा

भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष सखोल पुनरिक्षण () मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. या मोहिमेत महाराष्ट्राचा समावेश असून, राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. बीएलओच्या प्रत्यक्ष घरांना भेटी : महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम अत्यंत व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. यात राज्यातील एकूण ९ कोटी ८६ लाख ४४ हजार ४१३ मतदारांच्या तपशिलाची खातरजमा मतदान केंद्रस्तरीय अधिका-यांमार्फत ()नियुक्त करण्यात येणार आहे. हे अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहिती गोळा करतील. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमण्यात आलेले बूथ लेव्हल एजंट्स () त्यांना सहकार्य करणार आहेत. जनगणनेच्या कामाशी सांगड : सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामात व्यस्त असलेल्या क्षेत्रीय यंत्रणेचा विचार करून या तिसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबरमध्ये पूर्ण होईल. महाराष्ट्रासाठीचे महत्त्वाचे वेळापत्रक: दिनांक २० ते २९ जून २०२६ या कालावधीत बीएलओ यांना प्रशिक्षण आणि पूर्वतयारी करण्यात येईल. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी जाऊन भेटी देण्यात येतील. ५ ऑगस्ट २०२६ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल तसेच ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती नोंदविता येतील आणि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादीची प्रसिद्ध करण्यात येईल. राजकीय पक्षांना आवाहन : भारत निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले एजंट () नियुक्त करण्याचे आवाहन केले आहे. यामुळे मतदार यादीतून दुबार नावे तसेच मृत व्यक्तींची नावे काढणे आणि नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि अचूक होण्यास मदत होणार आहे.

# जिल्ह्यात मान्सूनपूर्व आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठक संपन्न

जनसंचलन बुलढाणा

जिल्ह्यात आगामी मान्सून काळात उद्भवणाऱ्या संभाव्य आपत्ती परिस्थितीचा प्रभावीपणे आणि सर्व यंत्रणांच्या समन्वयाने सामना करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्या अध्यक्षतेखाली आज दृकश्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) माध्यमातून ❇मान्सूनपूर्व आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठकपार पडली. या बैठकीत आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत सर्व यंत्रणांच्या सज्जतेचा सविस्तर आढावा घेऊन, आराखड्यातील तरतुदींची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले. मान्सून काळात जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही अधिकाऱ्याने मुख्यालय सोडू नये, अशा स्पष्ट सूचना यावेळी देण्यात आल्या. या बैठकीस अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कवळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी संभाजी पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी आणि विविध विभागांचे जिल्हा प्रमुख दृकश्राव्य माध्यमातून सहभागी झाले होते. बैठकीत प्रशासकीय यंत्रणेला सतर्कतेचे आदेश देताना जिल्हाधिकारी डॉ. देवरे यांनी सांगितले की, १ जूनपासून जिल्ह्यातील सर्व नियंत्रण कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावेत. प्रत्येक विभागाने आपापले आपत्ती व्यवस्थापन आराखडे अद्ययावत करून स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. तहसीलदारांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील बचाव साहित्य जसे की बोटी, लाईफ जॅकेट व इतर साधनसामग्री सुस्थितीत असल्याची खात्री करून तसे प्रमाणपत्र सादर करावे. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने उपलब्ध होऊ शकतील असे पोकलेन, जेसीबी, जनरेटर यांसारखी यंत्रसामग्री पुरवणारे कंत्राटदार आणि मोठ्या प्रमाणावर किराणा माल सप्लाय करणारे दुकानदार यांची यादी अद्ययावत ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले. पूरस्थितीमध्ये नदीकाठी किंवा पुलावर जाऊन स्टंटबाजी करणाऱ्या आणि सेल्फी काढणाऱ्या मंडळींमुळे जीवितहानी होण्याचा धोका असतो. अशा स्टंटबाजांवर कडक आळा घालण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना त्यांनी पोलीस व स्थानिक प्रशासनाला दिल्या. पूर आल्यामुळे मार्ग बंद झाल्यास प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी पर्यायी रस्त्यांची माहिती देणारी व्यवस्था कार्यान्वित करावी. या सर्व कामांमध्ये स्थानिक नागरिक आणि गावकऱ्यांची मदत घेऊन लोकसहभागातून आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावी करावे, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले. पूरग्रस्त आणि अतिसंवेदनशील गावांमध्ये सतर्कता वाढवण्यासाठी तहसील स्तरावर २० मेपूर्वी सूक्ष्म आराखडे तयार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. संपर्क तुटणाऱ्या गावांमध्ये मे महिन्यातच अतिरिक्त धान्यसाठा उपलब्ध करून देण्याचे निर्देश पुरवठा विभागाला देण्यात आले असून, आरोग्य विभागाने सर्पदंश व साथरोगावरील औषधसाठा सज्ज ठेवण्याच्या सूचना केल्या आहेत. धरण क्षेत्रातील गावांना पाण्याच्या विसर्गाबाबत आगाऊ सूचना देण्यासाठी दवंडी व पोलीस यंत्रणेचा प्रभावी वापर करावा, असेही बैठकीत सांगण्यात आले. आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या चौकटीत राहून प्रशासनातील प्रत्येक घटकाने आपल्या जबाबदारीची अंमलबजावणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी बैठकीच्या समारोपप्रसंगी केले.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यम निवासी शाळेत प्रवेशासाठी मुदतवाढ




जनसंचलन बुलढाणा

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला अंतर्गत येणाऱ्या अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील नामांकित इंग्रजी माध्यम निवासी शाळांमध्ये इयत्ता १ लीमध्ये शैक्षणिक सत्र २०२६-२७ करिता प्रवेश देण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी २५ मे २०२६ पर्यंत अर्ज सादर करावा, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी यांनी केले आहे. प्रवेश अर्ज प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला कार्यालय तसेच नजीकच्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये उपलब्ध आहेत. कोणत्याही भुलथापांना बळी न पडता अथवा इतर माध्यमातून अर्ज न घेता संबंधित कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधून अर्ज प्राप्त करून सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रवेश अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १० मे २०२६ पर्यंत होती. मात्र विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आता मुदतवाढ देण्यात आली असून अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २५ मे २०२६ पर्यंत राहणार आहे. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी अनुसूचित जमातीचा दाखला, वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांच्या आत असल्याचा तहसीलदारांचा दाखला, आधार कार्ड प्रत, संमतीपत्र व दोन पासपोर्ट फोटो जोडणे आवश्यक आहे. इयत्ता १ लीसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे वय ६ वर्षे पूर्ण असणे बंधनकारक आहे. तसेच आदिम जमातीतील विद्यार्थी, विधवा, घटस्फोटित, निराधार, परित्यक्ता तसेच दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. अपूर्ण कागदपत्रे अथवा खोटी माहिती आढळल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या महत्त्वाच्या उपाययोजना जाहीर

जनसंचलन/बुलढाणा

पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना ऊर्जा बचत, सार्वजनिक वाहतुकीचा वापर, स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन आणि अनावश्यक खर्च टाळण्याचे आवाहन केले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने विविध विभागांसाठी महत्त्वाच्या उपाययोजना जाहीर केल्या आहेत. राज्य शासनाच्या प्रस्तावित उपाययोजनांमध्ये परदेश दौऱ्यांवर निर्बंध, सार्वजनिक वाहतूक वापर वाढविणे, ऊर्जा बचत, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन, तसेच डिजिटल माध्यमातून बैठका घेण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. शासकीय अधिकाऱ्यांचे परदेश दौरे तात्पुरते रद्द करण्यात येणार असून, नव्या दौऱ्यांचे नियोजन टाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, वाहनांच्या वापरात कपात करून कारपूलिंग, सार्वजनिक वाहतूक आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एक दिवस मेट्रो, लोकल किंवा बसने प्रवास करण्याचेही सुचविण्यात आले आहे. मंत्रालय स्तरावरील, विभागीय स्तरावरील व जिल्हा स्तरावरील कार्यालयीन कामकाजासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा वापर वाढवून बैठका, प्रशिक्षण आणि सेमिनार ऑनलाइन घेण्यावर भर देण्यात येणार आहे. विद्यापीठे आणि महाविद्यालयांनाही याचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ऊर्जा बचतीसाठी कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा वापर, अनावश्यक दिवे व उपकरणे बंद ठेवणे, तसेच वातानुकूलन यंत्रणेचे तापमान २४ ते २६ अंशांदरम्यान ठेवण्याचे निर्देश आहेत. ङ्कप्रधानमंत्री सूर्यघरफ्र योजनेअंतर्गत सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्यावरही भर देण्यात येणार आहे. इंधन बचतीसाठी पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याबरोबरच पीएनजी () गॅसचा वापर वाढविण्यासाठी प्रलंबित प्रस्तावांना तातडीने मंजुरी देण्यात येणार आहे. मुंबईसह मोठ्या शहरांतील हॉटेल्स व रेस्टॉरंट्सनाही पीएनजी वापरासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. खाद्यतेलाच्या वापरात कपात करण्यासाठी शासकीय कॅन्टीन, अंगणवाडी, रुग्णालये आणि वसतिगृहांमध्ये मेन्यूत बदल करण्यात येणार असून, पाम व सोयाबीन तेलाऐवजी शेंगदाणा व मोहरी तेलाच्या वापराला चालना दिली जाणार आहे. आशा व अंगणवाडी सेविकांमार्फत जनजागृती केली जाणार आहे. कृषी क्षेत्रात रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून नैसर्गिक, जैविक आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी मोहीम राबविण्यात येणार आहे. माती परीक्षणावर आधारित पीकनिहाय मार्गदर्शन देण्यात येणार असून, खतांचा गैरवापर रोखण्यावर भर दिला जाणार आहे.

# ड्रोन उडवण्याचे दर्जेदार प्रशिक्षण मोफत अधिकृत परवाना घेऊन सुरू करा व्यवसाय

जनसंचलन बुलढाणा

शेतीपासून फोटोग्राफी, भूमापन, पीक सर्वेक्षण ते सरकारी प्रकल्पांच्या निरीक्षणापर्यंत विविध क्षेत्रांत ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर झपाट्याने वाढत आहे. या आधुनिक तंत्रज्ञानामध्ये करिअर घडवण्याची सुवर्णसंधी आता राज्य शासनाच्या अमृत ड्रोन मिशन 'तर्गत उपलब्ध झाली असून, पात्र युवकांना मोफत निवासी ड्रोन पायलट प्रशिक्षण दिले जात आहे. विशेष म्हणजे, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अधिकृत ड्रोन ऑपरेटर परवानाही दिला जातो. महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या रूपाने कार्यरत असलेली महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवकांना स्वयंरोजगार व उद्योजकतेसाठी विविध कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबवते. त्याचाच भाग म्हणून ङ्गङ्घअमृत ड्रोन मिशनफ्र ही योजना सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत दिला जाणारा १० दिवसांचा निवासी प्रशिक्षण कोर्स अत्यंत दर्जेदार असून, सामान्यतः यासाठी लाखो रुपये खर्च करावे लागतात. मात्र लक्षित घटकांतील युवकांना हे प्रशिक्षण पूर्णतः मोफत दिले जाते. प्रशिक्षण कालावधीत राहण्याची व जेवणाची व्यवस्थाही संस्थेकडूनच केली जाते. या प्रशिक्षणामध्ये शेती फवारणी, पीक सर्वेक्षण, भूमापन, एरियल फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी, आपत्ती व्यवस्थापन, ड्रोन हाताळणी, देखभाल व ङ्कडीजीसीएफ्च्या सुरक्षित उड्डाण नियमांचे सखोल मार्गदर्शन दिले जाते. प्रात्यक्षिक प्रशिक्षणावर विशेष भर असल्याने युवकांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळतो. आजपर्यंत शंभरहून अधिक लाभार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला असून, अनेकांनी ड्रोन सेवांद्वारे उत्पन्नाचे साधन निर्माण केले आहे. अमृत संस्थेच्या प्रशिक्षणाच्या गुणवत्तेची दखल घेत गोवा शासनानेही आपल्या अधिकाऱ्यांना याच संस्थेमार्फत प्रशिक्षण दिले आहे. पात्रता निकष : उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा, वय १८ ते ५५ वर्षे दरम्यान असावे, किमान बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असावे, शेतकरी कुटुंबातील



उमेदवारांना प्राधान्य, वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र आवश्यक. ही योजना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असून, ब्राह्मण, कायस्थ, वैश्य, मारवाडी, पटेल, राजपूत, सिंधी, बंगाली, गुजराथी, ठाकूर, जाट, लोहाना, भूमिहार आदी २५ जातींचा त्यात समावेश आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर लाभार्थ्यांना ड्रोन खरेदीसाठी अमृत संस्थेच्या कर्ज व्याज परतावा योजनेचाही लाभ मिळू शकतो. अर्ज प्रक्रिया : अर्ज प्रक्रिया पूर्णतः ऑनलाइन असून इच्छुकांनी अमृत संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करावा. अधिक माहितीसाठी जिगणेश कमाणी जिल्हा व्यवस्थापक, अमृत बुलढाणा मो. ९११२२२७६३७/८३०८९९८९२२ किंवा ३०५, तिसरा मजला, बुलढाणा प्राइड बिल्डिंग, तहसील कार्यालयासमोर, बुलढाणा येथे संपर्क साधावा.

# देशव्यापी औषध विक्रेता बंदच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाची केमिस्ट संघटनांसोबत बैठक संपन्न

जनसंचलन/बुलढाणा

ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्स () यांच्या वतीने बुधवार दि. २० मे २०२६ रोजी देशव्यापी एक दिवसीय बंदची घोषणा करण्यात आली असून, या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात नागरिकांना अत्यावश्यक औषधांचा पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी अन्न व औषध प्रशासन, बुलढाणा कार्यालयाने आवश्यक उपाययोजना सुरू केल्या आहेत. देशातील ठोक व किरकोळ औषध विक्रेत्यांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांच्या निषेधार्थ व्यवहार बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे नागरिकांना औषधांचा कोणताही तुटवडा जाणवू नये यासाठी प्रशासन सतर्क झाले आहे. या अनुषंगाने दि. १३ मे २०२६ रोजी अन्न व औषध प्रशासन, बुलढाणा कार्यालयात सहाय्यक आयुक्त (औषधे) गजानन प्र. धीरके यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील केमिस्ट व ड्रगिस्ट संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत बंदच्या काळात अत्यावश्यक औषधांचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक समन्वय, खबरदारी व उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. फुड अँड ड्रग्ज ॲडमिनीस्ट्रेशन महाराष्ट्र ( ) यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेते, रुग्णालयांशी संलग्न औषध दुकाने तसेच २४ तास सुरू असणाऱ्या औषध दुकानांशी संपर्क साधण्यात येत असून अत्यावश्यक औषधांचा पुरवठा खंडित होणार नाही यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधितांना औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस प्रशासन, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, इंडीयन मेडीकल असोसिएशन तसेच खाजगी व निमसरकारी रुग्णालयांशी समन्वय साधून आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे. प्रत्येक तालुका व गाव पातळीवर आवश्यक औषध दुकाने सुरू राहतील यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे सांगण्यात आले. बैठकीस केमिस्ट व ड्रगिस्ट संघटना, बुलढाणा यांचे अध्यक्ष गजानन जी. शिंदे, उपाध्यक्ष राजू पाटील तसेच निलेश गावंडे, गणेश बंगाळे, अभिजीत निंबाळकर, उमेश मुंदडा, चंद्रशेखर बारोटे व सुभाष पाटील उपस्थित होते. प्रशासनास आवश्यक सहकार्य करण्याबाबत संघटनांनी सकारात्मक भूमिका व्यक्त केली.

# माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियानाला बुलढाण्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

जनसंचलन/बुलढाणा

ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य अधिक सक्षम व निरोगी करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या माझं गाव आरोग्य संपन्न गाव या अभियानाला बुलढाणा जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यातील एकूण ८७० ग्रामपंचायतींनी या अभियानात सहभाग नोंदवून आरोग्यदायी गाव उभारण्यासाठी पुढाकार घेतला आहे. या अभियानांतर्गत गावपातळीवर स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी, लसीकरण, माता-बाल आरोग्य, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोग प्रतिबंध, कुपोषण निर्मूलन, तंबाखूमुक्त परिसर, नियमित आरोग्य तपासणी तसेच जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. ग्रामपंचायत, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी तसेच ग्रामस्थ यांच्या सक्रिय सहभागामुळे अभियानाला अधिक गती मिळाली आहे. गावांमध्ये आरोग्य विषयक स्पर्धा, स्वच्छता मोहिम, रक्तदाब व मधुमेह तपासणी, पोषण जनजागृती, शाळांमधील आरोग्य शिक्षण तसेच पर्यावरण संवर्धन उपक्रमही आयोजित करण्यात येत आहेत.निरोगी गाव समृद्ध गावफ्र हा संदेश नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचे कार्य अभियानातून सुरू असून जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागात आरोग्याबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढत असून उर्वरित गावांनीही अभियानात सहभागी होऊन आरोग्य संपन्न गाव घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात बुलढाणा जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी

## महाराष्ट्रात द्वितीय, विदर्भात प्रथम क्रमांक

जनसंचलन/बुलढाणा

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम () योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, बुलढाणा जिल्हा कार्यालयाने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्रात द्वितीय तर विदर्भात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्ह्यास ३१२ भौतिक प्रस्तावांचा लक्षांक प्राप्त झाला होता. ग्रामीण भागात उद्योगांना चालना देऊन रोजगारनिर्मिती करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, बुलढाणा कार्यालयामार्फत तब्बल १ हजार ०५२ उद्योजकांचे प्रस्ताव टास्क फोर्स समितीची मान्यता घेऊन विविध बँकांकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले होते. मंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा तसेच बँक अधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळे ३३८ प्रस्तावांना बँकांकडून मंजुरी मिळाली असून, यामध्ये एकूण ६८४.२३ लाख रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले आहे. त्यामुळे योजनेच्या १०८ टक्के उद्दिष्टपूर्तीची नोंद झाली आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील ५५६ व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाला आहे. या यशामागे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी संजय मोहनराव इंगळे यांचे योग्य नियोजन व प्रभावी मार्गदर्शन महत्त्वाचे ठरल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातही मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घेऊन युवकांनी उद्योग उभारणीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, बुलढाणा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८